



प्राचीन भारतातील ज्ञानवैभव
(Knowledge Splendor in Ancient India)
मुख्य संपादक – डॉ. महादेव गव्हाणे
कार्यकारी संपादक
प्रा. राजेन्द्रप्रसाद आर्य,
प्रा. रमेश रामलिंग स्वामी,
प्रा. विनय व्यंकट गायकवाड

ISBN 978-93-91689-63-6

अरुणा प्रकाशन
२०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७



© सर्व हक्क लेखकाधीन



प्रथम आवृत्ती :- फेब्रुवारी २०२३

मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर

अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्युटर, लातूर

मुखपृष्ठ : विरभद्र गुळवे

मूल्य : ३५०.०० रुपये


* "प्राचीन भारतातील ज्ञानवैभव" या पुस्तकातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्या संबंधी प्रकाशन, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

## मनोगत

भारतवर्ष खूप प्राचीन देश आहे येथील संस्कृती व ज्ञान परंपरा खूप प्राचीन आहे. भारतात पूर्वी नालंदा, तक्षशिला, काशी आदी ठिकाणी प्रसिद्ध विद्यापीठ होते. जेथे ज्ञान ग्रहण करण्यासाठी वेगवेगळ्या देशातून विद्यार्थी येवून ज्ञान ग्रहण करीत होते. संपूर्ण जगात भारताच्या विद्वत्तेची खूप मान्यता होती. कधी काळी भारताला 'सोने की चिडिया' म्हटले जात होते. त्याच्या मागे ज्ञान वैभवाची व धन, धान्य, संपत्तीची परिदृश्यता व्यक्त होते. या वैभवाला हानी पोहचविण्यासाठी आपल्या भारतावर मुगल, इंग्रज, डच, फ्रेंच, पोर्तुगीज आदींनी आक्रमण करून येथील संस्कृती, ज्ञान, परंपरा आदी नष्ट करण्यासाठी खूप प्रयत्न केले. येथील विद्यापीठांच्या ग्रंथालयांना आगी लावून वैज्ञानिक व आचार्य वृंदाना ठार मारून ज्ञान परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

आपले अनेक प्राचीन ऋषी मुनी खूप विद्वान व वैज्ञानिक होते. आयुर्वेदात चरक, वाग्भट, सुश्रुत आदी नाट्याचार्य भरतमूनी, गणित शास्त्रात भास्कराचार्य, व्याकरण शास्त्रात, पाणिनी, कात्यायन, पतंजली, खगोलशास्त्रात वराहमिहीर, आर्यभट्ट, रसायनशास्त्रात नागार्जुन, दर्शनशास्त्रात कपिल, कणाद आदी मुनींचे नाव आदराने घेतले जाते. यांच्या शोधांचा आधार घेवून आजदेखील त्यावर पुढे संशोधन चालू आहे.

संस्कृत साहित्यात काव्य, नाटक, काव्यशास्त्र आदी खूपच गंभीर व बोधप्रद आहे. अशा गंभीर विषयावर आमच्या महाविद्यालयाच्या संस्कृत विभागातर्फे 'प्राचीन भारतातील ज्ञान वैभव' या विषयावर एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रात अनेकांचे निबंध वाचन व विद्वानांचे व्याख्यान होणार आहेत. अशा या महत्त्वपूर्ण चर्चा सत्राच्या यशस्वितेसाठी शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व पश्चिम विभागीय केंद्र भारतीय सामाजिक विज्ञान व अनुसंधान परिषद मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यांच्या सहकार्याने ही राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो व कार्यक्रमाच्या सफलतेसाठी व स्मरणिकेच्या प्रकाशनासाठी शुभेच्छा व्यक्त करतो.

प्राचार्य, डॉ. महादेव गव्हाणे

## INDEX


१. आयुर्वेदाचे महत्त्व ....... ०९
डॉ.अपर्णा प्र जिरवणकर

२. वेदांचा आर्थिक दृष्टिकोन ....... १६
डॉ.नयन कुमार आचार्य

३. प्राचीन काळातील प्रशासन व्यवस्था ....... २२
प्रा. राजेंद्र प्रसाद किशनराव आर्य

४. प्राचीन भारतातील शास्त्रे – संगीतशास्त्र ....... २६
डॉ.माधवी श्रीपाद जोशी

५. अश्मयुगीन मानवाचे कलादालन – प्रागैतिहासिककालीन भारतीय चित्रकला ....... ३२
लेफ्ट.डॉ.अर्चना टाक

६. निबंधग्रंथाची समृद्ध परंपरा ....... ३६
प्रा. डॉ. प्रशांत बी. बिरादार

७. वैदिक वाङ्मयातील वास्तुशास्त्राची पार्श्वभूमी आणि विश्वकर्मप्रकाशः ग्रंथातील भूमिपरीक्षण सिद्धांत ....... ३९
सौ विनया मृगेंद्र बोधनकर

८. लातूर शहरातील संस्कृत शिलालेख ....... ४५
प्रा.डॉ.प्रियदर्शनी पाटील

९. दशरूपक आणि नाट्यदर्पण या ग्रंथांमधील शृंगाररसविषयक विचार – तुलनात्मक अध्ययन ....... ५४
श्रीमती शर्वरी विक्रांत वैद्य

१०. महानुभाव आणि जीवतत्त्व ....... ६२
विजय रोहिदास भोर

११. उपनिषदांतील भक्तिविचार ....... ६८
बडे गणेश मुरलीधर

१२. बसवपुराण या संस्कृत हस्तलिखिताची ओळख ....... ७४
प्रा. घाडगे शंकर धारबा

१३. भारतातील वैदिक ज्ञान (प्राचीन भारतातील ज्ञान वैभव) ....... ७९
सौ. मोहिनी मकरंद जोशी

१४. भारतीय संस्कृतीचा प्राण संस्कृत भाषा ....... ८५
प्रा. रमेश रामलिंग स्वामी

१५. वैदिक संस्कृत ग्रथांत प्रतिपादित वैदिक मूल्याचा आधुनिक शिक्षण प्रणालीत उपयुक्ता ....... ८८
कु. पल्लवी ज्ञानोबा सुरवसे

१६. आर्यकालीन यज्ञसंस्था व संत ज्ञानेश्वरांना अभिप्रेत यज्ञस्वरूप .... ९१
अशोक सुदामराव रूपनोर

१७. प्राचीन भारतीय मूल्याधिष्ठित विचारांची प्रस्तुता ....... ९७
प्रा. डॉ. अरुण चव्हाण

१८. भारतीय दर्शनामध्ये ईश्वराची संकल्पना ....... १०१
ज्योती उद्धवराव मामडगे

१९. द्वादशदर्शनसंग्रहाच्या दृष्टीकोनातून भारतीय दर्शनशास्त्रविचार ..... १०५
बालासाहेब दत्ता पोटे

२०. वेदोऽखिलो ज्ञानमूलम् तत्र ऋग्वेदः ....... ११०
प्रा. डॉ. नरेंद्र धोंडीराम शिंदे

२१. ।। कालिदाससाहित्ये प्रेमभावनायाः अभिव्यक्तिः।। ....... ११६
सत्यकाम आर्य

२२. सचित्र पञ्चरत्नगीता इति हस्तलिखितस्य स्वरुपम् ....... १२२
योगेश साहेबराव पाटील

२३. भारतीया विमानविद्या ....... १२७
अनंत कुलकर्णी

२४. भारतेषु वैदिक ज्ञानम् ....... १३३
सौ. वैशाली निशान्त: गौरशेट्टीवार

२५. कणादरहस्ये तमोवादः ....... १३९
अतुल ज्ञानोबा मस्के

२६. संस्कृत का शास्त्रीय वाङ्मय भारतीय सभ्यता का प्रतीक ....... १४३
डॉ. सत्येंद्र संगाप्पा राऊत

२७. प्रागैतिहासिक कला संचार तथा दृश्य संचार का अध्ययन ....... १४७
डॉ.आशिष गंगाधर उजवणे

२८. भारतीय दर्शनों का विभाजन ....... १५७
विनय व्यंकट गायकवाड

२९. ।। वैश्वीकरण के बाद संस्कृत भाषा एवं साहित्य ।। ....... १६२
ओमप्रकाश बरबडे

३०. ।। ध्वनि सिद्धान्त का साहित्य में योगदान ।। ....... १६७
ओमप्रकाश बरबडे

31. An Introduction to the Atharvaveda ....... १७२
Dr. Rahul Vasantrao More

32. Rainfall Calculation in Scientific Treatises in Sanskrit Especially in B[hatsaChitā and K[ci-Parāśara ....... १७७
Mr. Nikhil Dnyaneshwar Jagtap
Dr. Aniruddha Mandlik

33. Selected Stories from Jātaka for Welfare of the Human Beings ....... १८२
Priya Kamlakar Kamble

34. Shaivagama – An introduction of a tradition ....... १८८
Shashikant B. Dargu

35. Kautilya Arthshastra For Good Governance ....... १९१
Dr. Prakash Ratanlal Rodiya

36. The Elements of Peripeteia and Anagnorisis in Mrchchakatikam ....... १९७
Dr. Sachin Bhandare

37. Importance of Sastradana in Jain Manuscript Culture ....... २०२
Shailesh B. Shinde


+ + +

१.

# आयुर्वेदाचे महत्त्व


**डॉ. अपर्णा प्र. जिरवणकर**
बी.ए.एम.एस., पीएच.डी.(संस्कृत)
औरंगाबाद. मो.क्र. ९४०४४८६८३३


**रागदिरोगान्सततानुषक्ता नशेषकाय प्रसृतान् शेषान्।**
**औत्सुक्य मोहारतिदाञ्जघान योऽपूर्ववैद्याय नमोऽस्तु तस्मै।।**

(मंगलाचरण अष्टांगहृदय)

वेदामध्ये ज्ञानाचे दोन भाग मानले आहेत १. अविद्या २. विद्या

**विद्यां चाविद्या च यस्तद्वेदोभयम् सह।**
**अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते।।**

जो मनुष्य विद्या आणि अविद्याला सोबताच जानतो ते मनुष्य अविद्येद्वारे मृत्युला जिकून विद्याद्वारे मोक्ष प्राप्त करतो येथे अविद्या म्हणजे भौतिक, रसायन, जीव, वनस्पति, अभियांत्रिकी तसेच आयुर्वेद चिकित्सेचा समावेश होतो.

दुसऱ्या भागात म्हणजे विद्या मध्ये दर्शन, अध्यात्म, वेदांताचा समावेश होतो।

आता अविद्यापैकी आयुर्वेद शास्त्र याविषयी -

भारतात आयुर्वेदाची परम्परा वैदिक युगापासुन सुरु झाली.

**वेदातील वैद्यक परम्परा**

वैदिक साहित्यामध्ये प्रसंगानुरुप वैद्यकसंबंधी जे उल्लेख प्राप्त होतात ते इतके महत्त्वपूर्ण आहे की त्याच्या साहित्याने वैदिक कालीन आयुर्वेदाचा स्पष्ट परिचय मिळतो. ऋग्वेदातील भागामध्ये आश्विन नामक देव वैद्याचे चरित्र तसेच चिकित्सेचे वर्णन सापडते. अश्विनीकुमारांच्या चिकित्सेचे दृष्टान्त सुध्दा विलक्षण रोचक आहे. अश्विन ने वृध्द चवन ऋषीला पुन्हा यौवन प्राप्त करुन दिले युध्दामध्ये राजा खेलाची पत्नी विपश्यला हिचे शत्रुद्वारे पाय तोडले असता अश्विनीकुमारांनी लोखंडाचे पाय जोडून दिले. (ऋ. १/११६/१५) अश्विनीकुमारांनी दधिची ऋषीच्या मस्तकावर घोडयाचे मस्तक लावले व मधुविद्याचे ग्रहण करुन पुन्हा पूर्वीचे मस्तक लावले. (ऋ. १/११६/१२) अशी चमत्कारिक कार्य आयुर्वेदाच्या उन्नतीचे द्योतक आहेत.

३.

# प्राचीन काळातील प्रशासन व्यवस्था

प्रा. राजेंद्र प्रसाद किशनराव आर्य
(संस्कृत विभाग)
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर.
मो. ९४२२६४३५६०

जगातील सर्वात प्राचीन ग्रंथ ऋग्वेद मानला जातो. ऋग्वेदात व इतर वेदांमध्ये जीवनाशी निगडीत अनेक विषयांचे वर्णन आहे. वेदानंतर इतर वैदिक साहित्यात व मध्ययुगीन संस्कृत साहित्यात राजा, प्रजा, कर्मचारी, अधिकारी व प्रशासनाशी संबंधित अनेक बाबींचा सविस्तर उल्लेख आहे.

ऋग्वेदात या प्रकारे म्हटले आहे-

त्रीणी राजाना विदथे पुरुणि पुरि विश्वानि भूषथ: सदांसि ।
अपश्यमत्र मनसा जगन्वान व्रते गन्धर्वा अपि वायुकेशान्।।
ऋ. अ. ३. अ. २. व २४ मं. ११

तीन प्रकारच्या सभांनाच राजा मानावे. ज्यात पहिली आर्य राजसभा. दुसरी आर्य विद्या सभा व तिसरी आर्य धर्म सभा. या तिहींच्या समन्वयाने राजकारभार चालत असे.

यत्र ब्रह्म च क्षत्रं च सम्यञ्चौ चरत: सह।
तं लोकं पुण्यं यज्ञेषं यत्र देवा सहाग्निना।।
यजु. अ. २० मं. २५

अर्थात ज्या देशात विद्या सभेतील उत्तम ब्राम्हण व राज्यसभेतील शूर, वीर, क्षत्रिय हे एकत्रित येऊन राज्याचे कार्य करतात तोच देश, धर्म व शुभ कार्य यांच्या संयोगाने सुख प्राप्त करु शकतो. ज्या देशात यज्ञादी सत्क्रिया करणारे विद्वान असतात तोच देश सर्व प्रकारच्या उपद्रवांनी रहित होऊन अखंड राज्य नित्य भोगतात.

यजुर्वेदात अथर्ववेदात वेगवेगळ्या अध्यायांमध्ये ईश्वर, राजा, प्रशासन, राष्ट्र सुरक्षा इत्यादी संबंधात वर्णन आहे.



सभ्य सभा मे पाहि ये च सभ्या: सभासद: ।
त्वयेद्रा: पुरुहूत विश्वमायुर्व्य श्नवम्।।
अथर्व. का. १३ अनु. ७ व ५५ मं. ६

राजाने प्रजेशी कसे वर्तन करावे. या बाबत शतपथ ब्राह्मण ऐतरेय ब्राह्मण या ग्रंथात देखील उल्लेख वर्णन करीत राष्ट्र वा अश्वमेध: अर्थात राष्ट्र न्यायाने राज्याने पालन करणे म्हणजेच क्षत्रियांचा अश्वमेध होय घोड्याला मारुन त्याच्या अंगाचा होम करणे हा अश्वमेध नाही.

ऋग्वेद ६/२ ८/६ ८/४/९ आदी अनेक ठिकाणी समिती, सभांचा उल्लेख आहे. या ठिकाणी प्राचीन काळी राजकर्माशी संबंधित विषयांवर चर्चा आहे.

महाभारतात (४/१/२४) येथे सभास्तरचा प्रयोग न्यायाधीशासाठी केला आहे. महाभारतातील प्रसिध्द श्लोक-न सभा यत्र - -।

प्रसिध्द आहे जे संवादाला चर्चेला महत्व देते. राज्याशी संबंधित वर्णन उपनिषदात देखील आहे.

वैदिक युगानंतर समाजात प्रजातंत्र शासनाचे रुप आम्हाला पहावयास मिळतो. बौध्द व जैन साहित्यात गणतंत्र संघराज्याबद्दल सामग्री प्राप्त होते.

प्राचीन भारतात अनेक प्रकारची शासन प्रणाली विद्यमान होती या संबंधात संस्कृत साहित्य व पुरातत्व शिलालेख, स्तंभलेख आदींमध्ये प्रचुर सामग्री उपलब्ध आहे.

राजा कसा असावा याबद्दल मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती. कौटिलीय अर्थशास्त्र इ. ग्रंथामध्ये कुलीन सत्यवाक्य शुचि: तसेच

अराजके हि लोकेऽस्मिन्सर्वतो विद्रुते भयात् ।
रक्षार्थमस्य सर्वस्य राजानमसृजत्प्रभु:। ।
मनुस्मृति-७ अ. ३

असे म्हटले आहे.

विद्याविनीतो राजा हि प्रजानां विनये रत: ।
अनन्या पृथिवीं भुङ्क्ते सर्व भूतहिते रत: ।।
कौ. अर्थ. प्र. अधि. अ. ४

अर्थात जो विद्वान राजा प्राणिमात्रांच्या हितात असतो तो प्रजेच्या शिक्षणात तत्पर असतो तो चिरकाळापर्यंत पृथ्वीचा निर्बाध उपभोग घेतो.

राजकारभाराला सहाय्य करण्यासाठी अमात्य, मंत्र्याची नेमणूक होत असे.

या मंत्र्याची काम, भय, धर्म, अर्थ आदी उपधानी परीक्षण करुन त्यांना योग्य ते पद दिले जात असे.

प्राचीन भारतात धर्माचे स्थान अग्रगण्य होते. कार्यप्रणालीचे मूल धर्म होते. न्याय व्यवस्था नियंत्रित नव्हती. राजनीतिज्ञ पंडित सदाचारी पुरोहित न्याय व्यवस्था पाहत असे. रिपौ मित्रे च ये समाः अशी नीती होती. न्यायव्यवस्थेत प्राड्विवाक, धर्माधिकारी, पुरोहित आदींचा महत्वाची भूमिका होती.

गुप्तहेर संघटना बाबत कौटिलीय अर्थशास्त्राच्या प्रकरण ६ अध्याय १० यात असे म्हटले आहे की- उपधाभिः शुध्द अमात्य वर्गो गूढ पुरुषानुत्पादयेत गुप्तहेरांना राजाचा तिसरा नेत्र म्हटला आहे. इन्द्राचे एक नाव सहस्त्राक्ष आहे. ते या संदर्भाला अनुसरुन आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात गुप्तहेरांबद्दल सविस्तर वर्णन आहे. प्रशासन चालविण्यात यांचा अदृश्य रुपाने मोठा सहभाग असे. प्रजेचे दुःख, अडचणी, राष्ट्रीय-अंतरराष्ट्रीय घटना समजण्यासाठी नऊ प्रकारच्या कापटिक, उदास्थित, गृहपतिक, वैदेहक, तापस, तीक्ष्ण, रसद आदींचे सहाय्य घेऊन राजा प्रशासन चालवित असे.

राजकर टॅक्स ही संकल्पना प्राचीन काळापासून आहे. ज्या प्रकारे एक भुंगा टवटवीत फुलावरुन त्याची हानी न करता रस ग्रहण करतो. त्या प्रकारे राजादेखील प्रजेकडून कर घेत असे.

प्रजानामेव भूत्यर्थं स ताभ्यो बलिमग्रहीत् ।
सहस्त्रगुणमुत्स्त्रष्टुमादत्ते हि रसं रविः ।।

तो राजा दिलीप प्रजेच्या कल्याणाकरिताच प्रजेपासून कर भार घेत असे. साहजिकच आहे. सूर्यसुध्दा पर्जन्य रुपाने हजारो पटींनी परत देण्याकरिता पृथ्वीपासून रसाचे शोषण करतो.

मंत्रणा, दूत, दुर्ग, कोष, उचाधिकारी वेगवेगळया विभागाचे अध्यक्ष व त्यांचे कर्तव्य सेनाप्रमुख, नागरिकांचे कर्तव्य, आन्तरिक व बाह्य सीमा सुरक्षा, शत्रूबद्दल साम, दाम, दण्ड, भेदाचा समयानुसार यथायोग्य वापर, युध्दनीती, शत्रुवध, राजवाडा, राजाचे वैयक्तिक पारिवारिक कर्तव्य, राजाची दिनचर्या इत्यादीबाबत मनुस्मती, चाणक्यनीती, याज्ञवल्क्यस्मृती आदींमध्ये उल्लेख मिळतो.

राजा व प्रजा एकममेकाला प्रेमपूर्वक व्यवहार करीत सभा-समिती एकमेकांत विलीन होत प्रजेचे संरक्षण करीत होते.

सभा च मा समितिश्चावतां प्रजापते दुंहितरौ संविदाने ।
येन संगच्छा उप मा स शिक्षाच्चास वदानि पितरः संगतेषु ।।



अथर्व. ७-१२-१

प्राचीन भारताला 'सोने की चिडीया' म्हणत कारण की त्या काळात खूप वैभव धन संपन्नता होती. त्याचे प्रमुख कारण योग्य प्रशासन व्यवस्था प्रशासनाची कार्यक्षमता या राज्यकर्त्यांच्या कार्यशैली व गुणवत्तेवर ठरत असे. न्याय व्यवस्थेत धर्म, विश्वास, सत्याला विशेष महत्व होते.

आधुनिक काळातील प्रशासन व्यवस्थेत प्राचीन काळातील अनेक सिध्दांताचे काळानुरुप बदल करुन लोकहितकारी लोककल्याणाच्या काही गोष्टी घेतल्या आहेत.

अशा प्रकारे आम्हाला प्राचीन साहित्यात राज्य प्रशासनाशी संबंधित अनेक उदाहरणे वेगवेगळया ठिकाणी प्राप्त होतात.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

१. वैदिक सम्पति - पं. रघुनंदन शर्मा- प्रका. प्रतापसिंह शूर जी वल्लभदास मुंबई.
२. कौटिलीय अर्थशास्त्र - संपा. वाचस्पती गैरोला - चौखम्बा विद्याभवन, वाराणसी.
३. मनुस्मृती - टीकाकार - पं. श्री. हरगोविंद शास्त्री, चौखम्बा संस्कृत सीरिज आफिस, वाराणसी.
४. रघुवंश - संपा. रा. ग. बोरवणकर.
५. ऋग्वेदादिभाष्य भूमिका - दयानंद सरस्वती - प्रकाशक - आर्य समाज औरंगाबाद.
६. ऋक्सूक्तसंग्रह - डॉ. हरिदत्त शास्त्री, साहित्य भंडार, सुभाष बाजार, मेरठ.

+++